# तक्ता अ

## - : जाहिर नोटीस :-

जा.क्र./ ४२८८ /२०२४, दि. २४/१०/२०२४

## सह दिवाणी न्यायालय क. स्तर माढा

मा. दिवाणी न्यायालय क.स्तर, माढा येथील न्यायालय जुन्या इमारतीमध्ये सी.आय.एस. संगणक प्रणालीसाठी ऑप्टीलकल फायबर प्रस्थापीत करुन कार्यान्वीत करणेकामी आवश्यक साहित्यांची दरपत्रक सादर करणेकामी या" जाहिर टेंडर नोटीसीद्वारे स्थानिक अधिकृत पूरवठादार/विक्रेत्यामार्फत दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

नियम व अटी

१. मा. दिवाणी न्यायालय क.स्तर, माढा येथील न्यायालय इमारतीमध्ये आवश्यक ऑप्टीकल फायबर साहित्यांची दरपत्रके निविदेव्दारे सादर करणेकरिता ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १२ **(बारा)** दिवसात म्हणजेच दिनांक **०४/११/२०२४** रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत दिवाणी न्यायायलय क. स्तर माढा, यांच्या नावाने बंद लखोटयात दरपत्रक सादर करावे.

२. सदर बंद लखोट्यावर "**Optical Fiber connection for CIS AT Madha COURT**" असा उल्लेख करावा.

३. निविदाकारांना निविदा सादर करणे व सदर कामाकरिता आवश्यक वस्तू कार्यालयात पोहचविणे इ. बाबी स्वखर्चाने" करावे लागेल. निविदा व आवश्यक साहित्ये कार्यालयापर्यंत पोहचविण्याचा वाहतुक खर्च अनुज्ञेय होणार नाही.

४. सदर कामाबाबतचे देयके हि प्रत्यक्ष कामाकरिता वापरण्यात आलेल्या साहित्यानुसार काम पूर्ण झाल्यानंतर संबंधीतांच्या प्रस्थापीत अहवालावरुन अदा करण्यात येईल.

५. निविदाकार यांना सदर कामाचा इतर शासकीय कार्यालयांकडे काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

६. निविदाकारांनी निविदा / दरपत्रके सादर करतांना त्यावर GST /SGST क्रमांक असलेले तथापी, GST /SGST क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक नमुद असलेले निविदाकाराच्या लेटर हेडवरील दरपत्रक वैध असतील.

७. दरपत्रक भरतांना सर्व करांसह दरपत्रक भरावे. मात्र जी.एस.टी. टॅक्स असल्यास त्याचा स्वतंत्र दर नमुद करावा. त्याचवेळी महाराष्ट्र शासनास पुरवठा केल्यास तरतुदीप्रमाणे सुट दिली जाते त्या अटीस आधीन राहून दरपत्रक द्यावे लागेल तसेच बिलाची रक्कम अदा करतांना नियमानुसार टी.डी.एस.

कपात करण्यात येईल.

८. ज्या पूरवठादारास "पुरवठा आदेश" दिला जाईल त्या पुरवठादाराने सदर optical fiber connection Testing करुनच देयके सादर करावयाची आहेत.

९. प्रत्येक निविदाकारास फक्त एक निविदा/दरपत्रक सादर करण्याची परवानगी असेल.

१०. मुदती नंतर आलेल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.

११. दरपत्रके मंजूर करण्याचा अगर कोणतेही कारण न देता नाकारण्याचे सर्व अधिकार "मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, सोलापूर" यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

आदेशावरुन,

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर माढा